D:\2024-25\D\EST-2\Promotion\Driver 2025\Driver circular 2025.docx


# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

कृषि नगर, वसमत रोड,

परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.ac.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


**वाचा:**शासन राजपत्र दि.०२.०३.२०१७

**जा.क्र.२०२५/आस्था-२/4269** **दिनांक-: १३.१०.२०२५** 15

## परिपत्रक

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत सर्व कार्यालय प्रमुखांना सुचित करण्यात येते की, कायम आस्थापनेवरील चतुर्थश्रेणी गट-ड संवर्गातुन वाहन चालक/ कृषि यंत्र चालक/ट्रॅक्टर चालक/ट्रक चालक पदावर नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ आहे.

आपल्या अधिनस्त कायम अस्थापनेवर काम करणाऱ्या गट-ड (चतुर्थश्रेणी) संवर्गातील कर्मचाऱ्यापैकी ज्यांच्याकडे खालील शैक्षणिक पात्रता व संबंधीत वाहन चालविण्याचा परवाना आहे तसेच जे शारीरिकदृष्टया वाहन चालविण्यास सक्षम आहेत अशा इच्छुक कर्मचारी यांची संमती घेवून सविस्तर माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात भरून सदरची माहिती दिनांक २७.१०.२०२५ पर्यंत योग्य माध्यमाद्वारे कुलसचिव कार्यालयास सादर करावी.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| ०१ | वाहन चालक<br>(जीप/बस/कार/जड वाहने) | १.एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण<br>२.परिवहन अधिकारी यांचेकडील हलके /जड वाहन चालविणेचा परवाना आवश्यक |
| ०२ | कृषि यंत्र चालक/ट्रॅक्टर चालक | १.एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण<br>२.विभागीय परिवहन अधिकारी यांचेकडील ट्रॅक्टर चालविणेचा परवाना आवश्यक |
| ०३ | ट्रक चालक | १.एस.एस.सी परीक्षा उत्तीर्ण<br>२.विभागीय परिवहन अधिकारी यांचेकडील ट्रक चालविणेचा (जड वाहन)परवाना आवश्यक |

**अटी व शर्ती:**

१. गट ''ड'' (चतुर्थश्रेणी) संवर्गात किमान तीन वर्षाची नियमित सेवा झालेली असणै आवश्यक.

२. मोटार वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील तरतुदीनुसार सक्षम अनुज्ञप्ती प्राधिकारी यांनी दिलेला हलके मोटार वाहन किंवा मध्यम प्रवासी वाहन किंवा जड प्रवासी वाहन/ट्रॅक्टर/ ट्रक चालविण्याचा परवाना धारण करणे आवश्यक.

३. शासन मान्यता प्राप्त शाळेतुन माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण असणे.

४. मोटर वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक.

५. वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख व चांगली शारीरिक क्षमता असणै.

**वाहन चालविण्याचा स्वच्छ अभिलेख यामध्ये खालील बाबी येतात-**

वाहन चालक कोणतीही मादक द्रव्य किंवा अल्कोहोल सेवन करुन वाहन चालविण्याचा किंवा मोटर वाहन अधिनियम १९८८ (१९८८ चा ५९) मधील कोणत्याही दखलपात्र अपराधासाठी दोषी सिध्द झालेला नसावा . वाहन चालकाविरुध्द अपघाताचा गुन्हा दाखल झालेला नसावा.

६. संबंधीत क्षेत्राची परिपुर्ण भौगोलीक माहीती आहे.

७. मराठी, हिंदी भाषा वाचता, बोलता व इंग्रजी भाषा वाचता येणे आवश्यक आहे.

८. पदावर निवड होण्याकरिता वाहन चालविण्याचे चाचणी उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

९. पदावर नियुक्त होणारी व्यक्ती शाररिक दृष्टया पात्र असावी तसेच दृष्टीने चागंली असणे आवश्यक राहील. तो रातआंधळेपणा व रंग आंधळेपणा या व्याधीने ग्रस्त नसावा. त्यांने नियुक्ती पुर्वी शारीरिक दृष्टया पात्र असल्याचे व दृष्टी चांगली असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.(संबधीत जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रुग्णालय यांचे प्रमाणपत्र)

उपरोक्त पात्रता पुर्ण करू शकणाऱ्या गट-ड(चतुर्थश्रेणी) संवर्गातील कर्मचाऱ्यांची वाहन चालक /ट्रॅक्टर चालक/ट्रक चालक पदासाठीची माहिती सोबत शैक्षणिक पात्रता, जात प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र वाहन चालविण्याचा परवाना, वयाचा दाखला (सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रत), इत्यादी छायांकित प्रती साक्षांकित करून सोबत जोडण्यात याव्यात तसेच कर्मचाऱ्याचा कामा बद्दल तसेच वर्तणुकी बद्दल सविस्तर अभिप्राय स्वतंत्रपणे सोबत जोडण्यात यावेत.

वाहन चालक /ट्रॅक्टर चालक/ट्रक चालक संवर्गातील पदोन्नतीसाठी रिक्त पदसंख्या शासन निर्णयानुसार कमीं किंवा जास्त होऊ शकते याची नोंद घ्यावी. याबाबतचे अधिकार या कार्यालयाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

**मा.कुलगुरु महोदय यांच्या मान्यतेने...**

**सोबत :** प्रपत्र

**(संतोष वेणीकर)**
**कुलसचिव**

**प्रतिलिपीः**

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठता (कृषि)/संचालक संशोधन/संचालक विस्तार शिक्षण, सहयोगी अधिष्ठता (शिक्षण), वनामकृवि, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयाच्या गट-ड (चतुर्थश्रेणी) कर्मचाऱ्यास निदर्शनास आणून द्यावे.

२. नियंत्रक/विद्यापीठ अभियंता, वनामकृवि, परभणी

**प्रतः**

१.मा.कुलगुरु यांचे खाजगी सचिव,वनामकृवि, परभणी

२.आस्था-६ कार्यासन प्रमुख, उप-कुलसचिव,कुलसचिव कार्यालय, वनामकृवि, परभणी

३.प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन युनिट, वनामकृवि, परभणी यांना देवून सूचित करण्यात येते की, सदरील परिपत्रक व विहीत नमुना प्रपत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.

D:\2024-25\D\EST-2\Promotion\Driver 2025\Driver circular 2025.docx

# प्रपत्र

## वाहन चालक(जीप/बस/कार/जड वाहने)/ट्रॅक्टर चालक/ट्रक चालक पदावर पदोन्नती करिता कर्मचाऱ्यांची सेवा विषयक माहिती विद्यापीठ परिपत्रक दि.१३.१०.२०२५

| अ.क्र. | विवरण | | वैयक्तीक माहिती |
|---|---|---|---|
| १ | कर्मचाऱ्याचे नाव | | |
| २ | पदनाम | | |
| ३ | कार्यालयाचे नाव | | |
| ४ | कायम पदावरील रूजु दिनांक | | |
| ५ | परिविक्षा कालावधी पुर्ण झाल्याचा दिनांक | | |
| ६ | एकूण सेवेचा कालावधी | | |
| ७ | जन्म दिनांक | | |
| ८ | शैक्षणिक अर्हता | | |
| ९ | सेवांतर्गत शिक्षण घेतले असल्यास विद्यापीठ परवानगी आदेश | | |
| १० | कोणत्या पदाकरिता पदोन्नतीचा प्रस्ताव आहे | | वाहन चालक ( जीप/बस/कार/जड वाहने) / ट्रॅक्टर चालक/ट्रक चालक |
| ११ | परिपत्रकातील पात्रता धारण करीत आहेत का? | | |
| १२ | वाहन चालविण्याचा परवाना प्रकार(जड /हलके/इत्यादी) | | |
| | परवाना क्र. | | |
| | परवाना नुतनीकरण दिनांक | | |
| १३ | मोटार वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान आहे काय? | | होय/ नाही |
| १४ | वाहन चालविण्याचा अनुभव असल्यास प्रमाणपत्र | | |
| १५ | जातीचा प्रवर्ग | | |
| १६ | जात वैधता प्रमाणपत्र | लागू नाही<br>लागू असल्यास | ..........................................<br>जात वैधता प्रमाणपत्र क्र.<br>दिनांकः |
| १७ | कामाबद्दल व वर्तणुकी बद्दल सविस्तर अभिप्राय | | |

**कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी**

**दिनांकः**

**सोबत :** शैक्षणिक पात्रता, जात प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र, सेवांतर्गत शिक्षण घेतले असल्यास विद्यापीठ परवानगी आदेश, वाहन चालविण्याचा परवाना, वयाचा दाखला (टिसी/सेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची प्रतं) अनुभव प्रमाणपत्र इत्यादी छायांकित साक्षांकित प्रति सोबत